# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०१/२०१७

**१) गाईच्या खुल्या गोठयातुन बकऱ्याची चोरी . :–**

दिनांक १३/०१/२०१७ चे २१.०० वा ते १४/०१/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रशांत मारोती गिऱ्हेंपुजे वय ३२ वर्ष, रा. खरबी याचे खुल्या प्लॉट वरील गाई/बकरीचे खुल्या गोठयातुन फिर्यादीचे मालकीच्या १ काळया पांढऱ्या रंगाची पट्टेवाली शेळी, २ काळया रंगाच्या शेळया, कि. ८,०००/–रु. च्या कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) ट्रकची चोरी . :–**

दिनांक ०८/०८/२०१६ ते ०९/०८/२०१६ चे २०.०० ते ०९.०० वा. दर. यातील अर्जदार गौरीशंकर कृष्णराव वंजारी वय ३६ वर्ष, रा. शास्त्रीनगर भंडारा याने नेहमी प्रमाणे आपला ट्रक क्र. एमएच ३६ एफ १६७५ कि. अंदाजे १२,००,०००/–रु. चा हा पार्कींग करुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन अयोध्या नगर खात रोड भंडारा येथुन चोरुन नेल्याने या बाबत न्यायालयात दिलेल्या बयाना वरुन व मा. जेएमएफसी कोर्ट ४ थे भंडारा याचे आदेशान्वये पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१७ चे १४.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन यातील विरुध्द दिशेने येणाऱ्या मोटार सायकल क्र. एमएच ३१ बीडी ९५०५ ला बिनाकी फाटया जवळ येथे धडक मारुन मोटार सायकल चालक – राजकुमार भवनकुमार मेश्राम वय ५० वर्ष, रा. तुईयापार जि. बालाघाट याचे मरणास कारणीभुत होऊन मागे बसलेल्या फिर्यादीस किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादी सुनिल राजकुमार मेश्राम वय २४ वर्ष, रा. तुईयापार जि. बालाघाट यांचे तोंडी व डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन लिबांच्या झाडाला धडक देवुन स्वत:च्या मरणास व दुसऱ्या व्यक्तीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१७ चे ०७.३० ते ०८.३० वा. दर. यातील मृतक आरोपी याने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन रोडाचे बाजुला असलेल्या मोठया लिंबाच्या झाडाला धडक मारुन स्वत:चे मरणास व फिर्यादी जखमी श्रीकांत मानापुरे यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. शेटे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक १४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर, साकोली, पवनी व अडयाळ येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु कि. १,५००/–रू. व २ लिटर ७०० मिली लीटर देशी दारु कि. ७५०/–रु. असा एकुण २,२५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत संगणक कक्ष** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता